## नियमित दिवाणी मुकदमा क्र.८२/२०२० मधील नि.६३ वरील आदेश

CNR No.MHST1800001762020

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल होवून पुढील पुरावा देणेसाठी परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ याच्या कथनानुसार, दावा हा चौकशीसाठी व त्यांचा पुरावा देणेसाठी होता मात्र मागील तारखेला प्रतिवादी हे त्यांच्या महत्वाच्या कामानिमित्त परगावी गेले असल्यामुळे व त्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे न्यायालयात हजर राहू न शकल्याने त्यांचे विरूध्द "पुरावा बंद" असा आदेश पारित झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनानुसा, त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी त्यांना पुरावा देणेचा असून त्यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल न झाल्यास त्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे व त्यांना न्यायहक्कापासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल होवून त्यांना पुरावा देणेस संधी मिळणेची विनंती करून अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

०३. वादी यांनी सदरील अर्जास नि.६५ वर आपले म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेवून अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. वादी यांच्या कथनानुसार, सदर प्रतिवादी यांचा पुरावा अभिलेखावर दाखल असताना देखील ते पुरावा बंद आदेश रद्दबातल करणेची मागणी करीत असल्यामुळे तो कायदयाने मंजूर करता येणार नाही. सदरील प्रकरण हे युक्तीवादासाठी प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांना पुरावा देणेची संधी दिल्यास पुन्हा वादी यांचा पुरावा द्यावा लागणार आहे व युक्तीवादाचे कामकाज बाजूला ठेवून दाव्याचे कामी साक्षीदार तपासावे लागणार आहेत. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादी यांनी दाखल केलेल्या अर्जाचे, प्रतिवादी यांच्या म्हणण्याचे व दोन्ही बाजूच्या विधिज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१ याचे पुराव्याचे शपथपत्र व त्यावर वादीतर्फे उलटतपास देखील झाला असल्याचे व दाव्याचे कामकाज हे प्रतिवादीतर्फे पुढील पुराव्यासाठी असताना त्यांच्या विरूध्द पुढील पुरावा न दिल्याने त्यांच्या विरूध्द "पुरावा बंद" असा आदेश नि.१ वर दि.०९.०९.२०२५ रोजी पारित झाल्याचे दिसून येत आहे.

याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा हा वाद मिळकत ही गहाणमुक्त करून मिळणेसाठी व इतर दाद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे तसेच त्यांचा पुरावा देखील दिलेला असल्याचे दिसून येत आहे. मात्र वादी यांनी दाखल केलेले दाव्याचे स्वरूप व त्यातील मागणी लक्षात घेता प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द दि.०९.०९.२०२५ रोजी झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल करून त्यांना पुढील पुरावा देणेची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही तर प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल केल्यास व त्यांना पुढील पुरावा देणेस संधी दिल्यास दाव्याचा गुणावगुणांवर निर्णय देणेस व उभयतांमधील वादाचे निराकरण करणेस मदतच होवून न्यायहक्कापासून वंचित रहावे लागणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल करणे व पुढील पुरावा देणेस परवानगी देणे योग्य, संयुक्तिक व न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश परित आहे.

## आदेश

१.　नि.६३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.　प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द पारित झालेला "पुरावा बंद" आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३.　सदर आदेशाची नोंद दोन्ही बाजूचे पक्षकार व विधिज्ञांनी घ्यावी.

BAIG FATIMA BASHIR　Digitally signed by BAIG FATIMA BASHIR Date: 2025.10.14 17:09:44 +0530

दि.१३.१०.२०२५　　　　(एफ. बी. बेग)

वडूज.　　　　सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,वडूज.